RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक ७७] शुक्रवार, जून १४, २०१९/ज्येष्ठ २४, शके १९४१ [पृष्ठे ११, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जून २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक विधि-२०१९/प्र.क्र.७९/मशि-२.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक विधि पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक विधि पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक विधि पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश “मुख्य नियम ” असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ४ मधील, उप-नियम (३) वगळण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये,—

(एक ) उप-नियम (२) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :–

"(२) **पडताळणीमुळे गुणांमध्ये होणारा बदल.**—गुणांची पडताळणी केल्यामुळे अर्हता परीक्षेमधील गुणांमध्ये फेरबदल झाले असतील आणि संबंधित समुचित प्राधिकरणाने किंवा मंडळाने ते गुण यथोचितरित्या प्रमाणित केलेले असतील तर, ते गुण, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश देण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या पदनिर्देशित प्रतिनिधींना अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणाच्या दिवशी सायंकाळी ५-०० वाजेपूर्वी कळविण्यात येतील. "

(दोन) उप-नियम (३) मधील खंड (एक), उप-खंड (एक) च्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

"परंतु, समसमान गुण असतील त्या प्रकरणी, उमेदवारांमधील तौलनिक गुणवत्ता ही पुढील प्राधान्यक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

"(क) तीन वर्षाचा पदवी पाठ्यक्रम (विधि),—

(एक) सांविधिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

(दोन) सांविधिक विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(तीन) सांविधिक विद्यापीठाच्या पदवी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(चार) एच.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(पाच) एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(सहा) वयाने मोठा असलेला ;

(ख) पाच वर्षांचा संकलित पदवी पाठ्यक्रम (विधि) , —

(एक) अर्हता परीक्षेतील म्हणजेच एच.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(दोन) एच.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेत प्रथम भाषा विषयातील गुणाची अधिकतम टक्केवारी ;

(तीन) एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(चार) एस.एस.सी. किंवा समतुल्य परीक्षेत इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(पाच) वयाने मोठा असलेला ;"

४. मुख्य नियमांच्या नियम ९ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"९ . **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप).**— (१) विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ही, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) उमेदवारांना प्रवेश देईल. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (कॅप) टप्पे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील :—

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने संबंधित संचालनालयाशी विचारविनिमय करून माहिती पुस्तिका प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे ;

(ख) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना ऑनलाईन पद्धतीने भरणे ;

(ग) ऑनलाईन पद्धतीने आवेदनपत्राचा नमुना भरतांना प्रवेशासाठीच्या आवश्यकतेनुसार आवश्यक त्या वैध मूळ कागदपत्रांच्या स्कॅन प्रतिमा संगणकावर टाकणे (अपलोड करणे) ;

(घ) उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावरून कागदपत्रांची पडताळणी करून घेणे, उमेदवाराने आवेदनपत्रात केलेल्या दाव्याच्या पृष्टीदाखल सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे ;

(ड.) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे, तक्रारी असल्यास, त्या दाखल करणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे ;

(च) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) त्या त्या फेऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागा वाटप) प्रदर्शित करणे ;

(छ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या व तिसऱ्या फेरीपूर्वी संस्थांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाईन विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उमेदवारांना त्यांच्या पसंतीनुसार संस्थांचा पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येईल. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीपूर्वी विकल्प नमुन्यास एकदा का पुष्टी दिली की मग, तो विकल्प नमुना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या व दुसऱ्या फेरीच्या जागा वाटपासाठी

विचारात घेण्यात येईल. आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीपूर्वी पुष्टी दिलेला विकल्प नमुना, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फक्त तिसऱ्या फेरीच्या जागा वाटपासाठीच विचारात घेण्यात येईल.

(ज) वाटप केलेली संस्था दर्शविणारे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) संबंधीत फेरीचे तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे;

(झ) सक्षम प्राधिकाऱ्याने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार, उमेदवार त्याच्या लॉग-इन मधून प्रवेश उपस्थिती केंद्रावर जागा स्वीकृती फी भरून त्याला देऊ केलेली जागा स्वीकारील ;

(ञ) खंड (झ) नुसार जागेचा स्वीकार केल्यानंतरच, उमेदवारने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमधील अंतिम जागा वाटपानुसार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्यासाठी जागा वाटप केलेल्या संस्थेमध्ये हजर व्हायचे आहे;

(ट) सक्षम प्राधिकाऱ्याने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे विविध टप्पे पार पाडण्यासाठी विहित केलेल्या वेळापत्रकाचे पालन करणे बंधनकारक असेल.

(२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी आयोजित करणे.— पहिल्या फेरीकरीता उपलब्ध असलेल्या जागा संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम गुणवत्ता यादीत ज्या उमेदवाराचे नाव आले असेल तो उमेदवार ऑनलाईन विकल्प नमुना भरून या फेरीत सहभागी होण्यास पात्र असेल. उमेदवार त्याच्या लॉग-इन मधून विकल्प नमुना भरून त्यास पुष्टी देईल.

(३) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान,—

(क) उमेदवारास त्याच्या पहिल्या पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाल्यास, ती जागा आपोआप राखून ठेवली जाईल व उमेदवार अशाप्रकारे वाटप झालेल्या जागेचा स्वीकार करील. असा उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या त्यापुढील फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र असणार नाही. असे उमेदवार कागदपत्रांच्या पडताळणीसाठी व उमेदवार लॉग-इन मधून जागा स्वीकृती शुल्क भरण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होतील. तद्नंतर, असे उमेदवार वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होतील आणि वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेतील. जर असा उमेदवार जागा स्वीकृती कायम करण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर झाला नाही, तर त्याला वाटप केलेल्या जागेवरील त्याचे हक्क आपोआप गमावील आणि अशी जागा नवीन वाटपासाठी उपलब्ध होईल. अशा उमेदवाराकरिता अशाप्रकारे करण्यात आलेले हे जागा वाटप अंतिम असेल;

(ख) ज्या उमेदवारास त्याच्या पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाल्यास आणि उमेदवार या वाटपाने संतुष्ट असेल आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरींमध्ये सहभागी होण्याची त्याची इच्छा नसेल, असा उमेदवार त्याच्या लॉग-इन मधून त्यास देऊ केलेली जागा स्वतः गोठवू शकेल. उमेदवाराने त्याला एकदा वाटप केलेली जागा गोठविल्यावर, असा उमेदवार कागदपत्रांची पडताळणी व जागा स्वीकृती शुल्क भरण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होईल. तद्नंतर, असा उमेदवार वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होईल आणि त्याला वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेईल. अशा उमेदवाराकरिता अशारितीने करण्यात आलेले हे जागावाटप अंतिम वाटप राहील. जर असा उमेदवार, जागा स्वीकृती कायम करण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर झाला नाही, तर त्याला वाटप केलेल्या जागेवरील त्याचा हक्क आपोआप गमावील आणि ती जागा पुन्हा वाटपासाठी उपलब्ध होईल. जो उमेदवार वाटप केलेली जागा गोठवील तो नंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र नसेल;

(ग) ज्याला पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले असेल आणि त्याने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन जागा स्वीकृती कायम करण्यासाठी उमेदवार लॉग-इन मधून जागा स्वीकृती शुल्क भरले असेल असा उमेदवार वरच्या पसंतीक्रमांकावरील जागा मिळविण्याकरिता पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र असेल.

(घ) ज्याला पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले असेल आणि जागा स्वीकृती कायम करण्यासाठी त्याने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर न राहता ती जागा स्वीकारली नसेल आणि उमेदवाराने लॉग-इन मधून जागा स्वीकृती शुल्कही भरले नसेल तर असा उमेदवार पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र असेल.

(४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी फेरी आयोजित करणे, —

(क) दुसऱ्या फेरीकरिता उपलब्ध असलेल्या जागा, संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

(ख) दुसरी फेरी ही, ज्या उमेदवारांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले असेल आणि ज्या उमेदवारांना पहिल्या फेरीत कोणतीही जागा वाटप झाली नसेल त्यांच्याकरिता वरच्या पसंतीक्रमांकावरील जागा मिळविण्याकरिता असेल;

(ग) उमेदवारास दुसऱ्या फेरीनंतर वरच्या पसंतीक्रमांचा विकल्प उपलब्ध नसेल. उमेदवारांना दुसऱ्या फेरीत करण्यात आलेले वाटप आणि/किंवा ठेवून घेतलेले वाटप हे अंतिम वाटप असेल;

(५) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी आयोजित करणे, —

(क) तिसऱ्या फेरीकरिता उपलब्ध असलेल्या जागा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

(ख) तिसऱ्या फेरीकरिता पात्र असलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने विकल्प नमुना भरण्यास आणि / किंवा पूर्वीच्या फेरीसाठी उमेदवाराने भरलेल्या विकल्प नमुन्यामध्ये बदल करण्यास परवानगी देण्यात येईल. सामायिक प्रवेश परीक्षा अर्हतापात्र उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याफेरीपूर्वी त्यांची नोंदणी करण्यात कसूर केली असेल तर असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्याफेरीपूर्वी नोंदणी करण्यास पात्र असतील. परंतु, अशा नवीन नोंदणी केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यांची नावे पहिल्या गुणवत्ता यादीमध्ये प्रसिद्ध केलेल्या उमेदवाराच्याखाली ठेवण्यात येतील. या फेऱ्यांदरम्यान वाटप करावयाच्या जागा खालील प्रवर्गात मोडणाऱ्या पात्र उमेदवारांना उपलब्ध असतील,—

(एक) वरील उप नियम ३ (ग) व ३ (घ) मधील उमेदवार ;

(दोन) पूर्वीच्या कोणत्याही फेरीत कोणतीही जागा वाटप न झालेले उमेदवार;

(तीन) सामाईक प्रवेश परीक्षा अर्हतापात्र नवीन उमेदवार पूर्वीच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेरीमध्ये सहभागी (केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा अर्ज नमुना व विकल्प नमुना भरण्यात कसूर केलेले उमेदवार) झालेले नाहीत असे उमेदवार;

(ग) ज्या उमेदवारांना पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले आहे आणि त्यांनी जागा स्वीकृती कायम करण्यासाठी संस्थेला कळविले आहे अशा उमेदवारांना नवीन विकल्प नमुना भरताना त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेला पसंतीक्रम देणे आवश्यक नाही. एकदा वरच्या पसंतीक्रमाचे वाटप करण्यात आले की अगोदर करण्यात आलेले जागा वाटप गतिशील वाटपाच्या अर्जामुळे आपोआप रद्द होईल. जर उमेदवारास तिसऱ्या प्रवेशफेरीमध्ये जागा वाटप न झाल्यास, यथास्थिती पहिल्या किंवा दुसऱ्या फेरीमध्ये वाटप झालेली जागा आपोआप अबाधित राहील परंतु उमेदवारास प्रवेश कायम करण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्र आणि संबंधित महाविद्यालय / संस्थेत हजर व्हावे लागेल.

(घ) वाटप करण्यात आलेली जागा कायम करण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये उपस्थित होण्याच्यावेळी अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ कागदपत्रे सादर करील. त्यावेळी उमेदवाराने अर्जामध्ये अशारितीने केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ कागदपत्रे सादर करण्यात कसूर केल्यास ते जागा वाटप आपोआप रद्द होईल आणि ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल;

(ङ) उमेदवार प्रवेश उपस्थिती केंद्रावर मूळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस प्रवेश अर्जातील खालील चुका दुरुस्त करून घेण्यास हक्कदार असेल, जसे,—

(एक) लिंग बदल पुरुष व स्त्री आणि त्याउलट;

(दोन) परीक्षेतील, सामाईक प्रवेश परीक्षेतील गुण भरताना झालेली चूक. तथापि, गुणांतील वाढीमुळे पहिल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्ताक्रमात बदल करण्यास परवानगी नसेल;

(तीन) जात, पोटजात, मागासवर्गीय प्रवर्ग भरताना झालेली चूक. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने यथास्थिती जात प्रमाणपत्र, जमाती प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र, उन्नत प्रवर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र इत्यादीसारखी आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात कसूर करील तर, त्यास राखीव प्रवर्गातून सामान्य प्रवर्गात बदल करण्याची परवानगी राहील ;

(चार) आधारभूत कागदपत्र सादर करू न शकल्यामुळे अल्पसंख्याक दर्जा काढून टाकणे ;

(पाच) आधारभूत कागदपत्रे सादर न करू शकल्यामुळे विकलांग दर्जा काढून टाकणे ;

(सहा) आधारभूत कागदपत्रे सादर न करू शकल्यामुळे संरक्षण (Defense) दर्जा काढून टाकणे ;

(सात) उमेदवारी प्रकारातील बदल ;

(आठ) शैक्षणिक अर्हता बदल.

वरील बाबींव्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबीत बदल किंवा दुरुस्ती करण्यास परवानगी नाही.

(च) अतिरिक्त फेरीच्या बाबतीत (घेण्यात आल्यास), वरील खंड (ख) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवार या फेरीत सहभागी होण्यास हक्कदार असतील व ते नवीन विकल्प नमुना भरण्यास हक्कदार असतील. अशा प्रकरणी, उमेदवारास त्याला पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेला विकल्प पसंतीक्रमाच्या यादीत भरण्याची गरज असणार नाही. एकदा वरच्या पसंतीक्रमांकानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की, अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल. जर उमेदवारास अतिरिक्त प्रवेशफेरीमध्ये (घेण्यात आल्यास) जागा वाटप न झाल्यास, यथास्थिती पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेली जागा आपोआप अबाधित राहील, परंतु उमेदवारास प्रवेश कायम करण्यासाठी प्रवेश उपस्थिती केंद्रामध्ये आणि संबंधित महाविद्यालय किंवा संस्थेत हजर व्हावे लागेल.

(६) विहित केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवार त्यास अंतिमत: वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहील व त्या संस्थेतील त्याचा प्रवेश कायम करील. संस्था आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करील व उमेदवारांचा प्रवेश संस्थेच्या लॉग-इन मधून तात्काळ ऑनलाईन प्रणालीत टाकील (अपलोड करील) आणि उमेदवारास प्रवेश कायम झाल्याच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती देईल."

५. मुख्य नियमांच्या नियम १०, उप-नियम (१) मध्ये, -

(१) टप्पा- एक मध्ये ,

(एक) उप-खंड (क) नंतर पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व अनाथ उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल आणि त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गात जागा उपलब्ध नसल्यास, परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी त्यांचा विचार करण्यात येईल.";

(दोन) उप-खंड (ङ) व (च) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल:—

"(ङ) दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्या प्रवर्गात राखून ठेवलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल आणि त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गात जागा उपलब्ध नसल्यास, परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी त्यांचा विचार करण्यात येईल.

(च) संरक्षण प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्या संबधित प्रवर्गात राखून ठेवलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल आणि त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गात जागा उपलब्ध नसल्यास, परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी त्यांचा विचार करण्यात येईल.";

(ख) टप्पा-चार, टप्पा-पाच व टप्पा-सहा रद्द करण्यात येतील.

६. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,—

(एक) खंड (झ) मधील, "प्रवेश उपस्थिती केंद्रावर, सक्षम प्राधिकाऱ्याच्या नावे दर्शनी धनाकर्ष जमा करावा लागेल" या मजकुराऐवजी "उमेदवाराच्या लॉग-ईन मधून जागा स्वीकृती शुल्क भरावे लागेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (ञ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल: —

"(ञ) प्रवेश दिलेल्या सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क हे रु.१,००० एवढे असेल व हे शुल्क ना-परतावा असल्याचे मानण्यात येईल;".

(तीन ) खंड (ढ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील:-

" (ढ) उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये त्याच्या प्रवेशाशी संबंधित केलेले कोणतेही विधान किंवा दिलेली कोणतीही माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, प्राचार्य अशा उमेदवाराचा प्रवेश रद्द करून शुल्क जप्त करील. प्रवेश रद्द करण्याच्या कारवाई विरुद्ध सक्षम प्राधिकाऱ्यासमोर सात दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल. सक्षम प्राधिकारी त्या अपिलावर पंधरा दिवसांच्या आत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(ण) बनावट प्रमाणपत्रांच्या वापरासंबंधीच्या तक्रारींची तपासणी कालबद्ध पद्धतीने करण्यात यावी आणि त्यात दोषी आढळून आल्यास असा प्रवेश रद्द करण्यात येईल. शिवाय सक्षम प्राधिकाऱ्यास रितसर सूचित करून उचित कार्यवाही करण्यात येईल."

७. मुख्य नियमांच्या नियम १३ मध्ये,—

(एक) खंड (ग) मधील "समक्ष प्राधिकरणाने निश्चित केलेली देय रक्कम भरुन, सक्षम प्राधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) खंड (ङ) मधील "संस्था" या मजकुराऐवजी, "संस्था सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन ) खंड (च ) च्या ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(च) अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशत: किंवा पूर्णत:) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला प्रत्यर्पित करण्यास इच्छुक असेल तर ती केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील जागांचे वाटप प्रदर्शित करण्याच्या दोन दिवस अगोदर कळविल आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल. तद्नंतर, संस्थास्तरीय कोट्यातील जागा प्रत्यर्पित करण्याची मुभा त्या संस्थेला असणार नाही ;"

८. मुख्य नियमांच्या नियम १५ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"१५ *प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेद्वारे कागदपत्रे परत करणे:-*

(क) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑन-लाईन किंवा ऑफ-लाईन पद्धतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या, प्रणाली निर्मित अर्जाची किंवा हस्तलिखित अर्जाची स्वाक्षरीत प्रत संस्थेला सादर करील. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन किंवा ऑफ-लाईन पद्धतीने विनंती सादर केल्यानंतर, त्या उमेदवाराचा प्रवेश रद्द झाला असे समजण्यात येईल. उमेदवाराने प्रणाली निर्मित अर्जाची किंवा हस्तलिखित अर्जाची यथोचितरित्या स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केली किंवा कसे हे विचारात न घेता, संस्था, उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन किंवा ऑफ-लाईन पद्धतीने सादर केलेली विनंती अंतिम मानील. अशा प्रकारे जागा रद्द केल्यावर, उमेदवार त्या जागेवरील हक्क गमवील व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तद्नंतर, उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करू शकेल व प्रणाली निर्मित अर्जाची किंवा हस्तलिखित अर्जाची यथोचितरित्या स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसांच्या आत, संस्था, प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये १,००० वजा करुन उर्वरित संपूर्ण शुल्काची रक्कम परत करील आणि संस्थेला सादर केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे उमेदवारास परत करील ;

(ख) वरील खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकाऱ्याने विहीत केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकाच्या दिवशी सायंकाळी ५-०० वाजल्या नंतर जर उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असेल तर, उमेदवार प्रतिभूती ठेव आणि तारण धनठेव यांव्यतिरिक्त कोणत्याही शुल्काचा परतावा मिळण्यास पात्र असणार नाही;

(ग) कोणतीही संस्था, जिच्याकडे एखाद्या व्यक्तिने तिची पदवी, पदविका, किंवा अन्य कोणताही पुरस्कार किंवा इतर कागदपत्रे प्रवेशासाठी जमा केलेली असतील किंवा तिच्या ताब्यात असतील तर, ती संस्था अशा व्यक्तिवर अशा संस्थेमध्ये ती कोणताही अभ्यासक्रम किंवा अध्ययनक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसताना कोणतेही शुल्क किंवा शुल्क भरण्यास दबाव टाकण्याच्या किंवा सक्ती करण्याच्या उद्देशाने अशी पदवी, पदविका, पुरस्कार किंवा इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाही ;

(घ) संस्थेस, प्रवेश रद्द करण्याची विनंती करणाऱ्या विद्यार्थ्याकडून कोणत्याही प्रसंगी पुढील वर्षांचे शुल्क वसूल करता येणार नाही. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोहिणी भालेकर,**
शासनाचे उप सचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,**
Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 14th June 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. Vidhi-2019/C.R.79/Mashi-2.— In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Law Courses) Rules, 2017, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Law Courses) (Amendment) Rules, 2019.

2. In rule 4 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions to the Full Time Professional Under Graduate Law Courses) Rules, 2017 (hereinafter referred to as “the principal rules”), sub-rule (*3*) shall be deleted.

3. In rule 8 of the principal rules,—

(*i*) for sub-rule *(2),* the following sub-rule shall be substituted, namely :—

“*(2) Change of Marks due to verification.*—If the marks in the qualifying examination are modified due to verification and the same is duly certified by the concerned Appropriate Authority or Board, the same shall be reported to the Competent Authority for admission through Centralized Admission Process (CAP) or its designated representatives prior to 5 p.m. on the day of display of final merit list.”;

*(ii)* in sub-rule (3), for proviso to sub-clause (I), the following proviso shall be substituted, namely:

“Provided that, in case of tie, the relative merit of Candidates shall be resolved in the following order of preference and the methodology as specified below,—

(*a) Three Year Degree Course (LL.B.)—*

*(i)* first preference shall be given to the Candidate having Post Graduate degree of statutory University;

*(ii)* higher percentage of marks in Post Graduate degree of statutory University;

*(iii)* higher percentage of marks in Qualifying undergraduate examination;

*(iv)* higher percentage of marks in aggregate at HSC or equivalent examination;

*(v)* higher percentage of marks in aggregate at SSC or equivalent examination;

*(vi)* older in age.

*(b) Five Year Integrated Degree Course (LL.B.)—*

*(i)* higher percentage of marks in Qualifying Examination i.e. HSC or equivalent examination;

*(ii)* higher percentage of marks in first language at HSC or equivalent examination;

*(iii)* higher percentage of marks in SSC or equivalent examination;

*(iv)* higher percentage of marks in English at SSC or equivalent examination;

*(v)* older in age.”.

4. For rule 9 of the principal rules, the following rule shall be substituted, namely:—

“ 9. *Centralized Admission Process (CAP).*— (*1*) The Unaided Private Professional Educational Institution shall admit Candidates through the Centralized Admission Process (CAP) as referred to in sub-section (*3*) of section 3 of the Act. The stages of Centralized Admission Process (CAP) shall be as stated below,-

*(a)* Display or publishing of Information Brochure by the Competent Authority in consultation with the concerned Directorate;

*(b)* Filling online application form by Candidate for participation in the Centralized Admission Process (CAP);

*(c)* Uploading of scanned images of valid necessary original documents as per the requirement of the admissions while filling of online application form;

*(d)* Document Verification at Admission Reporting Center by the Candidate. It is mandatory on the Candidate's part to produce all original document in support of the claim made in the application form;

*(e)* Display or publishing of provisional merit lists, submission of grievances, if any, and display or publishing of final merit lists;

*(f)* Display of available Category wise Seats (Seat Matrix) available for respective CAP Rounds;

*(g)* Filling up and confirmation of online option form having preferences of Institutions prior to CAP Round-I and CAP Round-III. Candidates may fill in performances of Institutes in decreasing order of their preference as specified by the Competent Authority. The option form once confirmed prior to CAP Round-I shall be considered for allotment in the CAP Round-I and II and the option for confirmed prior to CAP Round III shall be considered for allotment in CAP Round III only;

*(h)* Display of provisional allotment of respective CAP Rounds indicating allotted institute;

*(i)* Candidate shall accept the offered seat by paying seat acceptance fee at Admission Reporting Centre (ARC) from Candidate's login as per the schedule declared by the Competent Authority;

*(j)* Only after seat acceptance as per clause (*i*), the Candidate should report to the allotted institute for seeking admission on the allotted seat as per final allotment in CAP rounds;

*(k)* The time schedule prescribed by Competent Authority for compliances for various stages of CAP is mandatory.

*(2)* Conduct of CAP Round –I.- The seats available for Round-I shall be published on the website. The Candidate whose names appeared in the final merit list of CAP shall be eligible to participate in this round by filling online option form. The Candidate shall fill and confirm the option form through Candidate's Login.

(*3*) During the CAP .—

(*a*) If a Candidate is allotted the seat as per his first preference, such allotment shall be auto freezed and the Candidate shall accept the allotment so made. Such Candidate shall then be not eligible for participation in the subsequent CAP rounds. Such Candidates shall then report to ARC for verification of documents and payment of seat acceptance fee through Candidate's Login. Thereafter such Candidate shall report to the allotted institute and seek admission on the allotted seat. If such Candidate does not report to ARC for confirmation of seat acceptance, their claim on the allotted seat shall stand forfeited automatically and the seat shall become available for fresh allotment. For such Candidate, the allotment so made shall be the final allotment;

(*b*) Candidate who have been allotted seat other than the first preference given by the Candidate and if the Candidate is satisfied with such allotment and do not wish to participate in further CAP rounds, such Candidate can freeze the offered seat through Candidate's Login. Once the Candidate freezes the allotted seat, such Candidate shall then report to ARC for verification of documents and payment of seat acceptance fee. Thereafter such Candidate shall report to the allotted institute and seek admission on the allotted seat. For such Candidate, the allotment so made shall be the final allotment. If such Candidate does not report to ARC for confirmation of seat acceptance, their claim on the allotted seat shall stand forfeited automatically and the seat shall become available for fresh allotment. The Candidate who freezes the seat shall then be not eligible for participation in the subsequent CAP rounds;

(*c*) Candidate who have been allotted seat other than first preference and accepted the seat by reporting to the ARC for confirmation of seat by paying the seat acceptance fee through Candidate's Login shall be eligible for participation in the subsequent rounds for betterment;

(*d*) Candidate who have been allotted seat other than first preference and not accepted the seat by not reporting to ARC for confirmation of seat acceptance and not paying the seat acceptance fee through Candidate's Login shall be eligible for participation in the subsequent rounds.

(*4*) Conduct of CAP Round II.—

(*a*) The seats available for Round II shall be published on the website.

(*b*) Round II will be betterment Round for those Candidates who have been allotted seat other than first preference and who have been not allotted any seat in Round-I.

(*c*) There shall be no further betterment option available to the Candidate after Round II. The allotment made and/or allotment retained in Round II shall be final.

(*5*) Conduct of CAP round III.

(*a*) The seats available for Round III shall be published on the website.

(*b*) The Candidates eligible for Round III are allowed to fill in and/or edit online option form filled in by the Candidate for the previous round. The CET qualified Candidates who has failed to register themselves before CAP Round I for the Centralized Admission Process (CAP) shall be eligible to register for Centralized Admission Process (CAP) before Round III. But the Merit List of such newly registered Candidates will be published separately and they will be placed below the Candidates whose names have been published in the first Merit List. The seats to be allotted during these rounds shall be available to the eligible Candidates falling under the following categories :—

(*i*) Candidates as per the sub-rule 3 (*c*) and 3*(d)* above;

(*ii*) Candidate who have not been allotted any seat in any of previous rounds;

(*iii*) CET Qualified newly Candidates who did not participate (failure of filling CAP application form and option form) in previous round.

(*c*) Candidates who have been allotted seat other than first preference and reported to Institution for confirmation of seat acceptance, whilst filling fresh option form, he need not fill the preference already allotted to the Candidate in the previous round. Once upward preference is allotted to such Candidate, his earlier seat allotment shall stand automatically cancelled due to application of dynamic allocation. If the Candidate is not allotted seat in Round III, the seat allotted in Round I or II, as the case may be, shall be retained automatically but the Candidate will have to report to ARC and Concerned College or Institute for Confirmation of Admission.

(*d*) At the time of reporting to the allotted college on Institution for confirming the allotted seat, the Candidate shall submit all the original documents in support of the claims made in the application. In that event, if the Candidate fails to produce the documents in support of the claims, so made in the application, the allotment shall stand cancelled automatically and the seat shall become available for allotment in further rounds;

(*e*) The Candidate will be entitled to rectify the following errors in the application form at the time of scrutiny of documents at ARC *viz.*

(*i*) change of gender from male to female and *vice-versa;*

(*ii*) error while entering marks obtained by Candidate in examination, CET. However, the change in the merit number declared *vide* First Merit List due to increase in the marks will not be permitted.

(*iii*) error with mentioning the caste, sub-caste, the category of backward class. A reserved category Candidate will be allowed to change his category from Reserved to General upon his failure to submit requisite documents like Caste Certificate, Tribal Certificate, Validity Certificate, Non-Creamy Layer Certificate, etc. as the case may be.

(*iv*) removal of minority status due to failure of submission of supporting documents;

(*v*) removal of Disability status due to failure of submission of supporting documents;

(*vi*) removal of Defense status due to failure of submission of supporting documents;

(*vii*) Change in type of Candidature;

(*viii*) change in Qualification.

Apart from the above, no other change or rectification shall be allowed.

(*f*) In case of additional round (if any), the category of Candidates mentioned in clause (*b*) above shall be entitled to participate and will be entitled to fill in fresh option Form. In such case, the Candidate need not fill in the previously allotted preference in their preference list. Once the upward allotment is made, the earlier allotment shall stand automatically cancelled. If the Candidate is not allotted seat in additional round (if any), the seat allotted in previous Round as the case may be shall be retained automatically but the Candidate will have to report to ARC and concerned College or Institute for Confirmation of Admission.

*(6)* The Candidate shall report to the institution finally allotted to him and confirm his admission in College or Institution as per the schedule. The College or Institute shall verify the required documents and upload the admission of the Candidates in the online system through Institute Login immediately and shall issue a system generated receipt of confirmation of admission to the Candidate.".

5. In rule 10 of the principal rules, in sub-rule *(1)*,-

*(a)* in clause (*i*), in Stage – I,

(*i*) after sub-clause *(a)* the following sub-clause shall be inserted, namely:—

"*(a-1)* Economically Weaker Section (EWS) and Orphan Candidates shall be considered for allotment of seats reserved for them as per their *Inter-Se-Merit*, and if seat is not available in the respective reserved category, then they shall be considered for allotment in Open Category as per the *Inter-Se-Merit*.";

*(ii)* for sub-clauses *(e)* and *(f)* the following sub-clauses shall be substituted, namely:—

"*(e)* Persons with Disability Category Candidates shall be considered for allotment of the seat reserved for them in their respective category, as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective reserve category is not available, then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se- Merit*.

*(f)* Defence Category Candidates shall be considered for allotment of the seats reserved for them in the respective category as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective reserve category is not available then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se-Merit*.";

*(b)* the Stage – IV , Stage –V and Stage – VI shall be deleted.

6. In rule 12 of the principal rules, —

*(i)* in clause *(i)*, for the words "a demand draft in favour of Competent Authority at and Admission Reporting Centre" the words "seat acceptance fee through Candidate's Login" shall be substituted;

*(ii)* for clause *(j)*, the following clause shall be substituted, namely: —

"*(j)* The seat acceptance fee shall be Rs. 1000/-, for all admitted Candidates and the same shall be treated as non- refundable.";

*(iii)* for clause *(n)*, the following clauses shall be substituted, namely: —

"*(n)* If any of the statement made in application form or any information supplied by the Candidate in connection with his admission is found to be false or incorrect, the Principal shall cancel his admission and forfeit the fees. An appeal against the action of cancellation of admission, may be preferred within seven days to the Competent Authority. The Competent Authority shall decide the appeal within fifteen days and his decision thereon shall be final.

*(o)* Complaints regarding the use of fake certificates to be investigated in time bound manner and if found guilty, such admission shall be cancelled. Further, appropriate action shall be initiated with due intimation to Competent Authority.".

7. In rule 13 of the principal rules, —

*(i)* in clause (*c*), the words " of Competent Authority by paying charges as decided by Competent Authority and on the website" shall be deleted;

*(ii)* in clause (*e*) for the words "The institution shall" the words "The institution after verification of all required documents shall prepare and" shall be substituted;

*(iii)* for sub-clause (*f*), the following sub-clause shall be substituted, namely: —

"(*f*) The Minority or Non-Minority institution intending to surrender the Institutional Quota (in part or full) of specified courses to the CAP shall communicate two days before the display of seat matrix of CAP Round I and the same shall be allotted as per the rules of CAP. The institute shall not be allowed to surrender Institutional Quota seats thereafter.".

8. For rule 15 of the principal rules, the following rule shall be substituted, namely: —

" 15. *Cancellation of admission and refund of fees, return of documents by Institutions*:—

*(a)* The Candidate shall apply online or off line for cancellation and submit duly signed copy of system generated application or hand written application for cancellation of admission to the Institution. Once the Candidate submits online or off line request for cancellation, his admission shall be treated as cancelled. The Institute shall consider the online or off line request made by Candidate for cancellation as final irrespective of whether he has submitted duly signed copy of system generated application or hand written application to the institute. Upon such cancellation, the Candidate shall lose the claim on the seat and such seat shall become available for further allotment. The Candidate shall then become entitled to and the institute shall refund the entire fee to the Candidate after deduction of Rs.1000/- towards processing charge and refund all his original documents submitted to the Institute within two days form submission of duly signed copy of system generated application or hand written application to the institute.

*(b)* Notwithstanding clause (*a*) above, Candidate shall not be entitled to any refund of his fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the Candidate after 5.00 p.m. of the cut-off date prescribed by the Competent Authority.

*(c)* No Institution, who has in its possession or custody, of any document in the form of certificates of degree, diploma or any, other award or other document deposited with it by a person for the purpose of seeking admission in such Institution, shall refuse to return such degree, certificate, award or other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such Institution.

*(d)* The Institution shall not recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ROHINI BHALEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.